# न्यूज एक्सप्रेस मराठी

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी–चिंचवड » मंगळवार, दि. 22 जुलै 2025 | पान- 1






# आयटी पार्कमधील कोंडीची कारणे अखेर मिळाली!

## आणि पोलीस अन् आयटीयन्सच्या संयुक्त सर्वेक्षणातून उपायही सापडले!

**पुणे | प्रतिनिधी**

हिंजवडीतील राजीव गांधी आयटी पार्कमधील वाहतूक कोंडीची समस्या बिकट बनली आहे. या कोंडीची नेमकी कारणे शोधण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिसांसह आयटीयन्सनी संयुक्त सर्वेक्षण केले. त्याचबरोबर कोंडी होणाऱ्या ठिकाणी करावयाच्या उपाययोजनाही निश्चित करण्यात आल्या. लवकरच शासकीय यंत्रणांकडून या उपाययोजना केल्या जाणार असल्याने आयटी पार्क कोंडीमुक्त होण्याची अपेक्षा आहे.



हिंजवडी आयटी पार्कमधील वाहतूक कोंडीसह नागरी समस्या सोडविण्यासाठी आयटीयन्सनी 'अनक्लॉग हिंजवडी आयटी पार्क' ही मोहीम राबविली होती. ही ऑनलाइन स्वाक्षरी मोहीम होती. त्यात सुमारे २५ हजारांहून अधिक आयटीयन्सनी सहभाग नोंदविला. आयटी पार्कमधील नागरी समस्यांचा मुद्दा वारंवार प्रकर्षाने समोर येऊ लागल्याने अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना १० जुलैला उच्चस्तरीय बैठक घ्यावी लागली. या बैठकीत त्यांनी आयटी पार्क परिसरात वाहतूक कोंडी होण्याच्या कारणांचा शोध घेण्यासाठी सर्वेक्षण करण्याचे निर्देश दिले होते.

मुख्यमंत्र्यांच्या निर्देशांनुसार, पिंपरी-चिंचवडचे अतिरिक्त पोलीस आयुक्त, वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त आणि आयटीयन्सच्या पथकाने १९ जुलैला संयुक्त सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणादरम्यान आयटी पार्क परिसरातील कोंडीच्या ठिकाणांची पाहणी करण्यात आली. त्या ठिकाणी काय उपाययोजना कराव्या लागतील, याची चर्चा करण्यात आली. आयटी पार्क परिसरातील कोंडीची ठिकाणे आणि त्या ठिकाणी करावयाच्या उपाययोजना यांचा अहवाल तयार करण्यात आला आहे. या अहवालाच्या आधारे लवकरच शासकीय यंत्रणांकडून उपाययोजना हाती घेतल्या जाणार आहेत. त्यानंतर आयटी पार्क परिसरातील वाहतूक कोंडीची समस्या कमी होण्यास मदत होणार आहे.

वाकड-पिंपरी चिंचवड रेसिडेंट्स डेव्हलपमेंट अँड वेलफेअर असोसिएशनचे सचिन लोंढे यांनी 'अनक्लॉग हिंजवडी आयटी पार्क' ही मोहीम सुरू केली होती. या सर्वेक्षणातून समोर आलेल्या उपाययोजनांबद्दल ते म्हणाले, 'हिंजवडी आयटी पार्क परिसरातील वाहतूक कोंडीस कारणीभूत ठरणारी ठिकाणे सर्वेक्षणादरम्यान निश्चित करण्यात आली आहेत. या ठिकाणी पोर्टेबल सिग्नल, वाहतूक पोलीस अथवा वॉर्डनची नियुक्ती, दुभाजक बसवणे, काही चौकांत प्रवेश बंद करणे, विरुद्ध दिशेने येणाऱ्या वाहनांवर नियंत्रण मिळवणे, तसेच डावीकडील मुक्त मार्ग यांसारख्या विविध उपाययोजना करण्याचे ठरले आहे. पुढील दोन ते तीन आठवड्यांत हिंजवडीतील वाहतूक विभागाला मिळणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या संख्येनुसार या उपाययोजना राबविल्या जाणार आहेत.'

### आयटी पार्क परिसरातील कोंडीची ठिकाणे

- मधुबन हॉटेल चौक (इंडियन ऑइल पेट्रोल पंपाजवळ)
- शेल पेट्रोल पंप चौक (छत्रपती शिवाजी महाराज चौकापूर्वी)
- छत्रपती शिवाजी महाराज चौक (मुख्य चौक)
- पांडवनगर चौक (टाटा टेक्नॉलॉजीज/ इन्फोसिस सर्कलजवळ)
- माणदेवी मंदिर रस्ता (आयटी पार्क टप्पा तीनजवळ)
- एसईझेड भवन वर्तुळ (आयटी पार्क टप्पा तीन)
- विप्रो टप्पा दोन वर्तुळ
- क्रोमा चौक/ॲमस्टरडॅम हॉटेल चौक
- माइंडट्री कन्सल्टिंग चौकाजवळील जंक्शन
- हिंजवडी पुलाखालील सेवा रस्ता आणि राष्ट्रीय महामार्ग (भुजबळ चौक)



# रेडझोनची हद्द दर्शविल्याने हजारो कुटुंबांना धक्का

## अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या मालमत्तेवर कारवाईची टांगती तलवार निर्माण झाली आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या प्रारूप सुधारित विकास आराखडा (डीपी प्लॅन) मध्ये नागरिकांची वैधरीत्या संपादित आणि विकसित केलेली मालमत्तेचा परिसर देहू ऑर्डनन्स फॅक्टरी डेपोच्या 2 हजार यार्डच्या प्रतिबंधक क्षेत्रात (रेडझोन) दर्शविण्यात आली आहे.

त्यामुळे निगडी, प्राधिकरण, रुपीनगर, साईनाथनगर, यमुनानगर, चिखली, तळवडे, रावेत, किवळे, मामुर्डी आदी भाग बाधित होण्याचा धोका आहे. त्यामुळे त्या भागातील हजारो कुटुंबांना धक्का बसला आहे. तसेच, अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या मालमत्तेवर कारवाईची टांगती तलवार निर्माण झाली आहे.

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने 99 वर्षांच्या भाडे कराराने वाटप केलेल्या निवासी जागांचे कायदेशीरपणे वाटपधारक किंवा भोगवाटदार यांना केले. त्या जागेवर बांधकाम करून तेथे नागरिक राहात आहेत. त्या जागेसाठी आवश्यक असलेले सर्व भाडेपट्टा प्रीमियम आणि शुल्क भरण्यात आले. तसेच, त्या जागेचा ताबा त्यांना वैधरीत्या हस्तांतरित करण्यात आला होता. त्यानंतर रहिवाशांनी प्राधिकरणाकडून आवश्यक त्या सर्व परवानग्या व दाखले तसेच, बांधकाम परवानग्या घेतल्या. नियमांनुसार त्यांनी त्या जागांवर निवासी बांधकाम पूर्ण केले. ती सर्व कागदपत्रे त्या रहिवाशांकडे उपलब्ध आहेत.

ती मालमत्ता ही वैधरीत्या एका वैधानिक प्राधिकरणाने वितरीत केली आहे. त्यानंतर वैध मंजुरींसह ती विकसित करण्यात आली आहे. त्या जागेचा 99 वर्षांच्या नोंदणीकृत भाडेपट्टाकरार त्यांच्याकडे आहे. तसेच, त्या मालमत्ता भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 300 अ अंतर्गत संरक्षित मालमता आहे.

मात्र, या मालमत्तेचा रेडझोनमध्ये समावेश केल्याने त्यांना पुनर्बांधणी, सुधारणा, हस्तांतरण आणि उचित बाजार मूल्यांकन यांसारख्या आवश्यक अधिकारांपासून वंचित ठेवले जात आहे. त्या मिळकतींवर लादलेला हा संपूर्ण निर्बंध कायदेशीर तत्त्वाचे उल्लंघन करतो. त्या जागेचे वाटप करताना किंवा बांधकाम करताना प्राधिकरणाने त्यांना अशा कोणत्याही प्रतिबंधक निर्बंधाची पूर्वसूचना दिली नव्हती. दोन हजार यार्डच्या रेडझोनची हद्द निश्चित करताना अस्तित्वातील कायदेशीर विकासाचा कोणताही विचार करण्यात आलेला नाही, असा आरोप रहिवाशांनी केला आहे.




### रेडझोनचा अचूक नकाशा का प्रसिद्ध केला जात नाही ?

**» पिंपरी-चिंचवड महापालिकेने भूमिअभिलेख विभागाकडून पिंपरी-चिंचवड शहरातील रेडझोनच्या हद्दीची ड्रोनद्वारे मोजणी केली आहे. तो रेडझोनचा अधिकृत अचूक नकाशा महापालिका प्रसिद्ध का करीत नाही? असा प्रश्न शहरवासीयांकडून विचारला जात आहे. तो नकाशा प्रसिद्ध केल्यास रेडझोनमधील हजारो कुटुंबांमध्ये असलेला संभ्रम दूर होईल. त्या संदर्भातील अफवांना लगाम बसेल, असे नागरिकांचे मत आहे.**

### नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**» प्राधिकरणाचे विसर्जन होऊन ते पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणात (पीएमआरडीए) विलीन झाल्यानंतर ते क्षेत्र पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियोजन अधिकार क्षेत्रात समाविष्ट करण्यात आले. महापालिकेने प्रसिद्ध केलेल्या डीपीत त्या जागा रेडझोन हद्दीत दर्शविण्यात आल्या आहेत. ही बाब नियमास धरून नसल्याने रहिवाशांमध्ये संभ्रम निर्माण झाला असून, भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.**

### रेडझोनमुळे मालमत्तेचे मूल्य घसरले?

**» रेडझोनच्या निर्बंधांमुळे त्यांच्या मालमत्तेची बाजारपेठेतील किंमत मोठ्या प्रमाणात घसरली आहे. तिची पुनर्बांधणी किंवा पुनर्विकास करणे योग्य राहिलेले नाही. वैधरीत्या प्राप्त आणि विकसित असूनही त्यांची मालमत्ता आता गोठवलेल्या मालमत्तेत रुपांतरीत झालेली आहे. हे नियामक पाउल एकप्रकारे अप्रत्यक्ष अधिग्रहण असल्यासारखेच आहे. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांनी वेळोवेळी असे निर्णय दिले आहेत की, वैध मंजुरीसह केलेले कायदेशीर बांधकाम भरपाई किंवा योग्य प्रक्रियेशिवाय पूर्वलक्षी प्रभावाने अवैध ठरवता येणार नाही.**

# अग्निशमनकडून आपत्ती व्यवस्थापन व बचाव कौशल्यांचे प्रशिक्षण

## अग्निशमन सेवा, आपत्ती व्यवस्थापन, घटनास्थळी त्वरीत कृती, तांत्रिक कौशल्ये, आणि विविध उपकरणांच्या वापराबाबत सैद्धांतिक व प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात आले

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अग्निशमन विभागाच्या वतीने विभागातील यंत्रसामग्री, उपकरणे आणि वाहनांची कार्यक्षमता तपासण्यासाठी तसेच नव्याने नियुक्त अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यास सक्षम करण्यासाठी विशेष उजळणी आणि प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अग्निशमन सेवा, आपत्ती व्यवस्थापन, घटनास्थळी त्वरीत कृती, तांत्रिक कौशल्ये, आणि विविध उपकरणांच्या वापराबाबत सैद्धांतिक व प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात आले.

या प्रशिक्षण सत्रात अग्निशमन सेवेत नुकतेच सरळसेवेने नियुक्त झालेले अधिकारी आणि कर्मचारी तसेच कार्यरत अनुभवी कर्मचारी सहभागी झाले होते. यामध्ये अग्निशमन सेवा, आपत्ती व्यवस्थापन, घटनास्थळी त्वरीत कृती, तांत्रिक कौशल्ये, आणि विविध उपकरणांच्या वापराबाबत सैद्धांतिक व प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात आले.

सत्रात रनिंग, पी.टी., स्कॉट ड्रिल, बचाव उपकरणे, रोप रॅपलिंग, न्यूमॅटिक एअर लिफ्टिंग बॅग, हायड्रॉलिक उपकरणे, आस्का लाइट, बीए सेट आणि बीए व्हॅन, तसेच अंडर वॉटर कॅमेरा, बोटिंग, लिफ्ट रेस्क्यू, ईव्ही फायर, क्लोरीन गळती रेस्क्यू, गॅस डिटेक्टर, सीपीआर, हायड्रॉलिक प्लॅटफॉर्म, फोम टेंडर इत्यादींचा वापर प्रत्यक्ष सरावाद्वारे शिकवण्यात आला. याशिवाय शहराची टोपोग्राफी, हॉस्पिटल आणि मॉल व्हिजिट, फायर सप्रेशन सिस्टम, फायर पंप आणि विविध ड्रिल्सही सत्राचा भाग होते.

नवीन कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण तर अनुभवी कर्मचाऱ्यांची उजळणी ही उजळणी मोहीम उप अग्निशमन अधिकारी विकास नाईक आणि रुपेश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. याच पद्धतीने इतर उपकेंद्रांमध्येही अशा प्रकारचे सत्रे राबवण्याचा विभागाचा मानस असून, विभागाची १०० टक्के कार्यक्षमता साधण्याच्या दिशेने हा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.




> **"महापालिकेच्या अग्निशमन विभागात कार्यरत कर्मचाऱ्यांची सतत क्षमता वृद्धिंगत होण्यासाठी अशा प्रशिक्षण सत्रांची नितांत गरज आहे. आधुनिक उपकरणांचा योग्य वापर आणि तांत्रिक कौशल्ये हीच आजच्या काळात प्रभावी बचावाची गुरुकिल्ली ठरते. विभागाच्या सर्व कर्मचाऱ्यांनी या सत्रात उत्तम सहभाग नोंदवला, ही समाधानाची बाब आहे."**
>
> **- उमेश ढाकणे, सहायक आयुक्त, महानगरपालिका**

# न्हावरे-शिक्रापूर राष्ट्रीय महामार्गावर धुळीने नागरीक त्रस्त

## गेल्या काही महिन्यांपासून सुरु असलेल्या रस्त्याच्या कामामुळे परिसरातील रहिवासी आणि प्रवाशांचे आरोग्य धोक्यात आले आहे

**पुणे | प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील शिक्रापूर ते न्हावरे (NH548D) दरम्यान सुरू असलेल्या राष्ट्रीय महामार्गाच्या कामामुळे नागरिकांना धुळीच्या वावटळीतून प्रवास करावा लागत आहे. गेल्या काही महिन्यांपासून चालू असलेल्या रस्त्याच्या कामामुळे स्थानिक रहिवासी आणि प्रवाशांचे आरोग्य धोक्यात आले आहे. पावसाने विश्रांती घेतल्याने रस्त्यावर पाण्याचा वापर कमी झाला असून, वाहनांमुळे उडणाऱ्या धुळीमुळे सर्दी, खोकला, डोळ्यांची जळजळ आणि घशाचे त्रास वाढले आहेत.

दुचाकीस्वारांसाठी हा मार्ग अत्यंत धोकादायक बनला असून, धुळीमुळे दृश्यता कमी होऊन अपघातांचा धोका वाढला आहे. रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यासाठी माळवाडी ते न्हावरे हा संपूर्ण रस्ता खोदण्यात आला आहे, परंतु काँक्रिटीकरणाचे काम अद्याप सुरु झालेले नाही, त्यामुळे धूळ उडण्याचे प्रमाण वाढले आहे.



### रास्ता रोको आंदोलनाचा इशारा

» नागरिकांचे म्हणणे आहे की, धूळ नियंत्रणासाठी दिवसातून ४-५ वेळा पाणी मारणे आवश्यक असताना, प्रत्यक्षात अत्यल्प पाण्याचा वापर होतो. ठेकेदार कंपनी आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्याकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत नागरिकांनी रास्ता रोको आंदोलनाचा इशारा दिला आहे. धुळीचा त्रास आंदोलनाच्या स्वरूपात तीव्र होण्यापूर्वी ठोस पावले उचलणे गरजेचे आहे.

निखिल कन्स्ट्रक्शनचे जी.एम. अनिल दळवी यांनी सांगितले की, पाणी मारले जात आहे, परंतु नागरिकांच्या तक्रारी लक्षात घेऊन पाण्याचे प्रमाण वाढवले जाईल.ही समस्या नागरिकांच्या आरोग्य आणि सुरक्षेशी निगडित आहे. संबंधित यंत्रणांनी तातडीने उपाययोजना न केल्यास नागरिकांचा उद्रेक होण्याची शक्यता आहे. धुळीचा त्रास आंदोलनाच्या स्वरूपात तीव्र होण्यापूर्वी ठोस पावले उचलणे गरजेचे आहे.

रस्त्याची धुळीमुळे पिकांची वाढ खुंटत आहे. धूळ झाडांच्या छिद्रांमध्ये जमा होऊन वायूंची देवाणघेवाण कमी करते, ज्यामुळे पिकांची वाढ आणखीनच मंदावते याचा परिणाम पिकात रोगराई वाढून उत्पन्न घटते. सध्या पाऊस नसल्याने रस्त्याच्या धूळमुळे नागरिकांना सर्दी, खोकला, डोळे व घसा अशा त्रासांना सामोरे जावे लागत आहे. विशेषता दुचाकीस्वारांसाठी अपघाताचा धोका वाढला आहे. रस्त्यावर धुळीचे लोट उठल्याने समोरून येणारी वाहने दिसेनाशी होतात. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. हा रस्ता काँक्रिटचा तयार करण्यात येणार आहे. या रस्त्याचे काम करीत असलेल्या कंपनीने माळवाडी ते न्हावरे एवढा संपूर्ण रस्ता खोदून ठेवला आहे. अद्याप काँक्रिटीकरणाचे काम चालू झाले नसल्याने येथे मोठया प्रमाणावर धुळ उडते आहे. संबंधित यंत्रणांनी तात्काळ लक्ष घालून ठोस उपाययोजना न केल्यास धुळीचे लोट आंदोलनात बदलण्याची शक्यता आहे.

### संबंधित यंत्रणांचे दुर्लक्ष?

» नागरिकांचे म्हणणे आहे की, दिवसातून किमान ४-५ वेळा पाणी मारणे गरजेचे असताना प्रत्यक्षात फारच कमी प्रमाणात पाणी टाकले जाते. ठेकेदार कंपनी आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्याकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत नागरिकांनी रास्ता रोकोचा इशारा दिला आहे.

### शेतकऱ्यांचेही नुकसान

» रस्त्यावरील धूळ शेतातील पिकांवर साचून प्रकाशसंश्लेषण प्रक्रिया मंदावत आहे, ज्यामुळे पिकांची वाढ खुंटते आणि रोगराई वाढून उत्पन्न घटते. धुळीमुळे झाडांच्या छिद्रांमध्ये अडथळा निर्माण होऊन वायूंची देवाणघेवाण कमी होते, याचा थेट परिणाम शेतीवर होत आहे.

# कर्जमाफीचा गाजावाजा, पण घोषणा नाहीच!

## पुणे जिल्ह्यातील इंदापूर, बारामती, दौंड या प्रमुख तालुक्यातील शेतकऱ्यामध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे

**पुणे | प्रतिनिधी**

मुंबईत नुकतेच पार पडलेल्या महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात बहुचर्चित शेतकरी कर्जमाफीची घोषणा होईल, अशी अपेक्षा संपूर्ण राज्यभरातील शेतकऱ्यांना होती; मात्र अधिवेशनाचा समारोप झाल्यावरही सरकारकडून कर्जमाफीसंदर्भात कोणतीही ठोस घोषणा झाली नसल्याने पुणे जिल्ह्यातील इंदापूर, बारामती, दौंड या प्रमुख तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मागील नोव्हेंबरमध्ये पार पडलेल्या विधानसभेच्या निवडणुकांपूर्वी तत्कालीन उपमुख्यमंत्री आणि सध्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रचार सभांमधून सत्तेत आल्यास शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देण्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतर भाजपप्रणित महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले, पण कर्जमाफी केवळ घोषणांपुरतीच राहिली. उलटपक्षी, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कर्जमाफीचे आम्ही आश्वासन दिलेच नाही असा घुमजाव केला. या पाठीमागे असलेल्या राजकीय बोलघेवडेपणावरून शेतकरी संघटना आणि विरोधी पक्षांनी सरकारवर जोरदार टीका केली. पण सरकारकडून नेहमीप्रमाणे योग्य वेळी निर्णय घेऊ अशी नेहमीची प्रतीक्षा लावणारी भाषा वापरून वेळ मारून नेली जात असल्याची भावना



निर्माण झाली आहे.

जिल्ह्यातील बहुतेक आमदार हे सत्ताधारी पक्षाचे असून त्यांच्याकडून विधिमंडळात शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर ठोस आवाज उठवला जाईल, अशी अपेक्षा होती. मात्र, ना लक्षवेधी सूचना, ना ठराव, ना आंदोलन – ही बेफिकिरी पाहून शेतकऱ्यांमध्ये लोकप्रतिनिधींबद्दल नाराजी आहे.

### पावसाळी अधिवेशनही निराशाजनकच ठरले

» अनेकांची नजर पावसाळी अधिवेशनाकडे लागली होती. मुख्यमंत्री फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आश्वासक विधान दिली होती. पण अखेरपर्यंत सरकारने शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसंबंधी कोणतीही अधिकृत घोषणा केली नाही. त्यामुळे आश्वासनांवर विश्वास ठेवून किती काळ थांबायचे? असा सवाल शेतकरी करत आहेत.

### लाडकी बहीण योजना ठरत आहे अडथळा?

» राज्य सरकारच्या लाडकी बहीण योजनेमुळे कर्जमाफीला खीळ बसली आहे, असे बोलले जात आहे. या योजनेसाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जातोय, तर दुसरीकडे लाखो शेतकरी कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या करत आहेत. अन् काही नेत्यांसाठी भाऊ-बहीणच 'लाडकी' राहणार का? आम्ही शेवटचे नाही का? असा सवाल रस्त्यावरच्या शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे.